# ई-निविदा सूचना

## जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा
## सिव्हील लाईन, सेवाग्राम रोड, वर्धा ४४२००१
## दुरध्वनी क्रमांक ०७१५२-२४०१५५

जिल्हा व सत्र न्यायालय वर्धा मुख्यालयी तसेच अधिनस्थ तालुका न्यायालय समुद्रपुर, सेलु, हिंगणघाट व आर्वी येथे सफाईगार, शिपाई व पहारेकरी पदांच्या सेवा बाह्ययंत्रणेव्दारे कंत्राटी तत्वावर शिपाई , पहारेकरी व सफाईकरीता सफाईगार, या पदांच्या सेवा पुरविण्याकरीता (कामाचे स्वरुप सोबतचे परिशिष्ठ ड मध्ये दर्शविल्याप्रमाणे राहील) शासनमान्य कंत्राटदारांकडून करार झाल्यापासून दोन वर्षांच्या करारासाठी विहीत नमुण्यामध्ये ई-निविदा ऑनलाईन दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहेत. जिल्हा न्यायालयाच्या प्रशासकीय कार्यालयाच्या अटी व शर्तीसह ई-निविदा प्रपत्र खाली दिलेले संकेतस्थळ https://mahatenders.gov.in मध्ये दिनांक ०५.०२.२०२६ रोजी सकाळी ११.०० ते दिनांक २५.०२.२०२६ रोजी सायंकाळी ०६.०० वाजेपर्यत उपलब्ध राहील. सदर ई-निविदा सुचना ही जिल्हा न्यायालयाचे संकेतस्थळ http://wardha.dcourts.gov.in वर उपलब्ध आहे. जिल्हा व सत्र न्यायालय वर्धा मुख्यालयी तसेच तालुका न्यायालय निहाय पदांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | न्यायालयाचे नाव | पदनाम व पदांची संख्या | | |
|---|---|---|---|---|
| | | **शिपाई** | **सफाईगार** | **पहारेकरी** |
| १ | जिल्हा व सत्र न्यायालय, **वर्धा** | --- | ०३ | ०३ |
| २ | जिल्हा न्यायालय-१ व अति. सत्र न्यायालय, **हिंगणघाट** | --- | ०१ | ०१ |
| ३ | दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, **हिंगणघाट** | --- | ०१ | ०१ |
| ४ | दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, **आर्वी** | ०२ | ०१ | ०२ |
| ५ | दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, **समुद्रपुर** | --- | ०१ | ०१ |
| ६ | दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, **सेलू** | --- | ०१ | ०१ |
| | **एकुण पदे** | **०२** | **०८** | **०९** |

निविदेबाबतचा तपशिल परिशिष्ठ-अ प्रमाणे आहे. सहभागी होणा-या सर्व निविदाकारांनी या ई-निविदेसोबत संलग्न करण्यात आलेले **परिशिष्ठ- 'अ' ते 'ड'** सविस्तर वाचून निविदा सादर करावी.

## परिशिष्ठ-अ

| REF NO.: DC WARDHA/TC-CLASS-IV/E-TENDER NO.- ०१/२०२६ | | |
|---|---|---|
| १) | ई-निविदा प्रसिध्दी | दि. ०५/०२/२०२६ वेळ सकाळी ११.०० वा. |
| २) | ई-निविदा विक्री/डाउनलोड सुरु करण्यांचा दिनांक | दि. ०५/०२/२०२६ वेळ सकाळी ११.०० वा. |
| ३) | निविदापुर्व सभा (Pre-Bid Meeting) | दि. १८/०२/२०२६ वेळ सकाळी ११.०० वा. |
| ४) | ई-निविदा भरण्याचा/सादर करण्याचा दिनांक | दि. ०५/०२/२०२६ वेळ सकाळी ११.०० वा. |
| ५) | ई-निविदा भरण्याचा/सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि. २५/०२/२०२६ वेळ सायकांळी ०६.०० वा. |
| ६) | तांत्रिक ई-निविदा उघडण्याचा दिनांक (शक्य असल्यास) | दि. २७/०२/२०२६ वेळ दुपारी ०२.०० वा. |

| निविदा क्रमांक | कामाचा नांव | कामाची अंदाजे किंमत रुपये | नोंदणीकृत कंत्राटदाराने भरावयाची बयाना रक्कम | कामाचा कालावधी | ई-निविदा अर्जाची किंमत |
|---|---|---|---|---|---|
| ०१/२०२६ | जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा यांचे मुख्यालयी तसेच अधिनस्त तालुका न्यायालय येथे बाह्ययंत्रणेव्दारे कंत्राटी तत्वावर शिपाई, सफाईगार, व पहारेकरी या पदांच्या सेवा पुरविणेबाबत. | **९७१६५७१.३६** | रुपये १,००,०००/- (रुपये-एक लाख रुपये फक्त) | दोन वर्षाकरिता | रुपये १०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) |

१) उपरोक्त ई-निविदा सुचनेतील अधिक माहितीकरीता इच्छुक निविदाकारांनी संकेतस्थळ https://mahatenders.gov.in तसेच http://wardha.dcourts.gov.in मध्ये पहावे.

२) सहभागी होणा-या निविदाकारांनी ऑनलाईन ई-निविदा सादर करण्यासाठी ना-परतावा ई-निविदा शुल्क रुपये १०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) (प्रति निविदा फॉर्म) इतकी रक्कम व बयाना (EMD) रक्कम रुपये १,००,०००/- (रुपये-एक लाख रुपये फक्त) ही **https://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर Online दिनांक २५/०२/२०२६ रोजी सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत जमा करणे आवश्यक आहे.

३) ई-निविदा सुचना उपरोक्त संकेतस्थळावर दिनांक ०५/०२/२०२६ वेळ ११.०० ते दिनांक २५/०२/२०२६ रोजी सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील.

४) कंत्राटदारांना ई-निविदेबाबत काही अडचणी असल्यास Helpdesk No. ०१२०-४००१००२/०१२०-४००१००५ email : support-cproc@nic.in वर संपर्क साधावा.

५) एक किंवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता कोणत्याही वेळी रद्द करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवलेला आहे. तसेच याबाबत निविदाकाराला कोणत्याही प्रकारची तक्रार, आर्थिक भरपाई व नुकसान भरपाई अथवा दावा करता येणार नाही.

६) प्राप्त निविदेमधील तांत्रीक निविदाची पुर्तीकेल्यानंतर किमान वेतन कायदयापेक्षा जास्त व शासकीय नियमानुसार मागणी केलेल्या पदासाठी सेवा पुरविण्यासाठी सर्वात कमी एकसमान दर एकापेक्षा जास्त निविदाकारांचे आढळून आल्यास सदर कार्यालय हे त्या निविदाकाराचा अनुभव, त्याचे वार्षीक उलाढाल व त्याची बाहययंत्रणेद्वारा दिलेले मनुष्यबळाची संख्या तसेच त्याची कामाबाबता उत्तम अहवाल व इतरही बाबी ग्राह धरुन एका निविदाकाराची निविदा स्वीकारण्याचा अधिकारी राखून ठेवत आहे.

ठिकाण : वर्धा
दिनांक : ०५ /०२/२०२६

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
वर्धा

## परिशिष्ठ-ब

जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धाचे मुख्यालयी तसेच अधिनस्त तालुका न्यायालय, हिंगणघाट, सेलु, समुद्रपुर, व आर्वी येथे बाह्ययंत्रणेव्दारे कंत्राटी तत्वावर शिपाई, सफाईगार व पहारेकरी या पदांच्या सेवा पुरविण्याकरीता (कामाचे स्वरुप सोबतचे परिशिष्ठ-ड मध्ये दर्शविल्याप्रमाणे राहील). शासनमान्य कंत्राटदारांकडून दोन वर्षासाठी भरण्याकरीता निश्चित केलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | पदाचे नाव | एकूण पदे | दर (प्रती पद/महिना) | वार्षिक रक्कम (दोन वर्षाकरिता) |
|---|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा व सत्र न्यायालय वर्धा मुख्यालय तसेच अधिनस्त तालुका न्यायालय, हिंगणघाट, आर्वी, समुद्रपुर, सेलु, येथे बाह्ययंत्रणेव्दारे कंत्राटी तत्वावर शिपाई, सफाईगार व पहारेकरी या पदांच्या सेवा पुरविणे. | शिपाई | ०२ | २१२९७.१० | १०,२२,२६०.८० |
| | | सफाईगार | ०८ | २१३२३.६३ | ४०९४१३६.९६ |
| | | पहारेकरी | ०९ | २१२९७.१० | ४६,००,१७३.६० |
| **एकुण** | | | **१९** | **६३९१७.८३** | **९७१६५७१.३६** |

## जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा
## ई-निवीदेचे सविस्तर वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| १) | निविदेचा संदर्भ | ई-निवीदा सुचना प्रसिध्दी दिनांक ०५/०२/२०२६ रोजी ई-निविदा जाहिरात नवभारत/लोकमत न्युज पेपर ला प्रकाशित करण्यात आली. |
| २) | निविदा प्रपत्र उपलब्धतेबाबतचा कालावधी | दिनांक ०५/०२/२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दिनांक २५/०२/२०२६ वेळ सायंकाळी ०६.०० पर्यत संकेतस्थळ https://mahatenders.gov.in तसेच http://wardha.dcourts.gov.in मध्ये उपलब्ध राहील. |
| ३) | ई-निविदा अर्ज शुल्काची (Form Fee) रक्कम व बयाना रक्कम (EMD) जमा करण्याचा पर्याय, अंतिम दिनांक व वेळ | ई-निविदा शुल्काची रक्कम १०,०००/- व बयाना (EMD) रक्कम रुपये १,००,०००/- (रुपये-एक लाख रुपये फक्त) Online-Net banking द्वारेच दिनांक २५/०२/२०२६ रोजी सायंकाळी ०६.०० वोजपर्यंत भरणे आवश्यक राहील. |
| ४) | तांत्रिक निविदा (Technicla Bid) उघडण्याची तारीख व वेळ (शक्य असल्यास) | दिनांक २७/०२/२०२६ रोजी दुपारी ०२.०० वाजता |
| ५) | ई-निविदा पाठविण्याचा पत्ता (संकेतस्थळ) | संकेतस्थळ https://mahatenders.gov.in वर |
| ६) | दुरध्वनी क्रमांक | ०७१५२-२४०१५५ |

# जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा
## विवरणपत्र (परिशिष्ट — क)
## प्रपत्र -१

**तांत्रिक लिफाफा क्र.१ मध्ये निविदाकार संस्थेने सादर करावयाची आवश्यक कागदपत्रे.**

खालील नमुद कागदपत्रे तांत्रिक लिफाफा क्र.१ मध्ये अनुक्रमे सादर करुन व सदर कागदपत्रांवर १ ते १८ अनुक्रमांक नमूद करुन दाखल करावीत. ज्या निविदेमध्ये खालील माहिती अपूर्ण आढळून येईल त्यांची निविदा रद्द करण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| १) | कंपनी/ संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत (शासनमान्य कंत्राटदार असल्याचे दर्शविण्याकरीता) | |
| २) | कंपनी / संस्थेचे पॅन / टॅन कार्डची छायांकित प्रत | |
| ३) | कंपनी / संस्थेचे वस्तु व सेवा कराराच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत | |
| ४) | कंपनी / संस्थेचे प्रोफेशनल टॅक्स प्रमाणपत्राची छायांकित प्रत | |
| ५) | कंपनी / संस्थेचे पि.एफ. प्रमाणपत्राची छायांकित प्रत | |
| ६) | कंपनी / संस्थेचे ई.एस.आय.सी प्रमाणपत्राची छायांकित प्रत | |
| ७) | कंपनी / संस्थेचे (कमितकमी १०० कामगार पुरवठा) अधिकृत परवाना प्रमाणपत्राची (Valid License) छायांकित सत्य प्रत (कामगार आयुक्त कार्यालयाने दिलेले) | |
| ८) | कंपनी / संस्थेचे मागील तीन आर्थिक वर्षाच्या (सन २०२२-२०२३, २०२३-२०२४, २०२४-२०२५) आयकर प्रमाणपत्र व रिटर्न्सची छायांकित सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे. | |
| ९) | कंपनी / संस्थेचे मागील तीन आर्थिक वर्षाचे ऑडिट रिपोर्ट (सन २०२२-२०२३, २०२३-२०२४, २०२४-२०२५) जोडणे आवश्यक आहे. | |
| १०) | निविदा धारक कंपनी / संस्थेचे सन २०२२-२०२३, २०२३-२०२४, २०२४-२०२५ या प्रत्येक वर्षाची उलाढाल रक्कम रुपये २,००,००,०००/- अक्षरी रु. दोन कोटी मात्र किंवा त्यापेक्षा जास्त असल्याबाबतचे चार्टड अकाउंटंट यांचेकडून प्रमाणित केलेले प्रमाणपत्र (ज्यावर सही शिक्का व UDIN नंबर असावा) जोडणे आवश्यक आहे. | |
| ११) | सहकारी संस्था असल्यास मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, वर्धा या नावाने निविदा भरणेबाबत मा. सहा. निबंधक, सहकारी संस्था यांचे चालू महिन्यातील अनुमती पत्र. | |
| १२) | रुपये ४०,००,०००/- रुपये चाळीस लक्ष मात्र राष्ट्रीयीकत/शेडूल्ड बँकेचे सॉलव्हंसी प्रमाणपत्र निविदाधारकाने सादर करणे आवश्यक आहे. | |
| १३) | सदया वैध गुणवत्ता सेवा प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. | |
| १४) | शासकीय संस्थेत कंत्राटी पध्दतीने संबंधित सेवा पुरविल्याचा कमीतकमी दोन कोटी रुपये व त्यापेक्षा जास्त रकमेचे काम केल्याबाबत तसेच सन २०२४-२०२५ यावर्षी कमीतकमी १०० कुशल/अकुशल कर्मचारी कामावर असल्याबाबतच्या ई.एस.आय.सी व पी.एफ. चा भरणा केलेल्या चलानच्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. | |
| १५) | ई-निविदाकाराने स्वत:वर कोणताही गुन्हा दाखल नसल्याबाबतचे तसेच त्याच्या संदर्भात कोणतेही प्रकरणे न्यायालयात प्रलंबित नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र (नोटरी केलेले) तसेच चालू महिन्यातील अद्यावत पोलिस चारित्र पडताळणी प्रमाणपत्र दाखल करावे. | |
| १६) | कंत्राटदाराने/संस्थेने/कंपनीने त्यांना काळया यादीत न टाकल्याबाबत/बंदी न घ्यातल्याबाबतचे घोषणापत्र दाखल करावे. | |
| १७) | कंत्राटदाराने/संस्थेने/कंपनीने निविदेसोबत, "निविदा सूचनेमध्ये ज्या पदाकरीता निविदा भरण्यात येत आहे त्या पदाच्या कामाबाबत संपूर्ण माहिती करुन घेतली असून ती कंत्राटदारास पूर्ण समजली आहे व त्यानुसार निविदा भरली आहे" अशा आशयाचे हमीपत्र निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे. (हमीपत्राचा नमुना ई-निविदेसोबत सलग्न करण्यात आला आहे.) | |
| १८) | ई-निविदाकाराने निविदा फॉर्म शुल्क व बयाणा रक्कम भरल्याबाबतचे ऑनलाईन भरणा पावती सादर करावी. | |

# निविदा नमुना

| | | |
|---|---|---|
| निविदा मागविणाऱ्या कार्यालयाचे नाव | : | **जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा** |
| कामाचे स्वरुप | : | जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा मुख्यालय तसेच अधिनस्त तालुका न्यायालय हिंगणघाट, आर्वी, समुद्रपुर व सेलु येथे बाह्ययंत्रणेव्दारे कंत्राटी तत्वावर सफाईगार, शिपाई व पहारेकरी या पदाकरीता बाह्ययंत्रणेव्दारे (आऊटसोर्सिंगद्वारे) कंत्राटी सेवा उपलब्ध करुन देणे. |
| निविदा क्रमांक | : | REF NO.: DC WARDHA/TC-CLASS-IV/E-TENDER/NO.- 01/2026 |
| कंत्राटदाराच्या संस्थेचे / कंपनीचे नाव | : | |
| कंत्राटदाराच्या संस्थेचा / कंपनीचा संपूर्ण पत्ता | : | |
| कंत्राटदाराच्या संस्थेचा / कंपनीचा दुरध्वनी/संकेतस्थळ/ई-मेल आयडी | : | |
| कंत्राटदाराच्या संस्थेचा / कंपनीचा नोंदणी क्रमांक | : | |
| कंत्राटदाराच्या संस्थेचा / कंपनीचा वस्तु व सेवा कर क्रमांक | : | |

## प्रपत्र -२
## नमुना-१

| अ. क्र. | कामाचे स्वरुप | मागणी करण्यात आलेली कर्मचारी संख्या | मागणी केलेल्या पदासाठी कंत्राटी सेवा पुरविण्यासाठी कंत्राटदाराने मागणी केलेली रक्कम (वार्षिक खर्च) | वस्तु व सेवा कर (वार्षिक खर्च) | एकुण रक्कम (रुपये) (स्तंभ ४+५+६) | एकूण रक्कम (रुपये अक्षरी) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा मुख्यालयी तसेच अधिनस्त तालुका न्यायालय हिंगणघाट, आर्वी, समुद्रपुर व सेलु येथे बाह्ययंत्रणेव्दारे कंत्राटी तत्वावर सफाईगार, शिपाई व पहारेकरी या पदाकरीता बाह्ययंत्रणेव्दारे (आऊटसोर्सिंगद्वारे) कंत्राटी सेवा पुरविणे. | १९ | | | | |

निविदेची एक वर्षासाठी होणारी एकूण रक्कम रुपये.......................................................................

(अक्षरी .......................................................................................................................)

(कंत्राटदारचे नांव, सह, शिक्का, दिनांक)

अ) स्तंभ क्र ४ ते ७ मधील माहिती कंत्राटदारांनी भरावयाची आहे.

## नमुना-२
## अतिकालीन भत्ता

| अ.क. | कार्यालयाचे नांव | पदसंख्या | अतिकालीक भत्याची रक्कम (प्रतितास) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा मुख्यालयी तसेच अधिनस्त तालुका न्यायालय हिंगणघाट, आर्वी, समुद्रपुर व सेलु येथे बाह्ययंत्रणेव्दारे कंत्राटी तत्वावर सफाईगार, शिपाई व पहारेकरी या पदाकरीता बाह्ययंत्रणेव्दारे (आऊटसोर्सिंगद्वारे) कंत्राटी सेवा पुरविणे. | १९ | |

**टिप** :- कंत्राटदार संस्था / कंपनी यांची कंत्राटी सेवा उपलब्ध करुन देतांना, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्रमांक पदनि/२५१२/प्र.क्र.१५७/का.१२, दिनांक २७ जानेवारी २०१५, शासन निर्णय क्रमांक : कंत्राटी २०१५ /प्र.क्र.१९४ / का.१२, दिनांक २३ फेब्रुवारी, २०१७, व शासन परिपत्रक क्रमांक : पदनि/२०२२/प्र.क्र.१५/आ.पु.क, दिनांक २७ एप्रिल 2022 मधील निर्देशाचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर या क्रमांकावर उपलब्ध आहेत.

## जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा
## अटी व शर्ती

१) कंत्राटदाराने परिशिष्ट-क मधील अनुमांक ०१ ते १८ मध्ये नमूद सर्व कागदपत्रांच्या प्रती त्यावर अनुक्रमांक नमूद करुन वरील अनुक्रमांकानुसार सादर करणे आवश्यक राहील. जे निविदाकार तांत्रिक निविदेसोबत वरील सर्व कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर करणार नाहीत त्यांना तांत्रिक निविदेमध्ये अपात्र घोषित करण्यात येईल.

२) जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा मुख्यालय तसेच अधिनस्त तालुका न्यायालय हिंगणघाट, आर्वी, सेलु व समुद्रपुर येथे बाह्ययंत्रणेव्दारे कंत्राटी तत्वावर सफाईगार, शिपाई व पहारेकरी या पदाकरीता कंत्राटी कामगार किमान ७ वा वर्ग उत्तीर्ण असणे आवश्यक असेल व शारीरिक दृष्ट्या सुदृढ असणे आवश्यक आहे. कत्रांटी कामगारांचे वय १८ ते ४० दरम्यान असावे. तसेच कंत्राटी कामगारास नेमून दिलेल्या जागी तेथील न्यायीक अधिकारी/कर्मचारी यांनी निर्देशित तसेच यापुढील परिशिष्टात नमुद केल्याप्रमाणे काम करणे बंधनकारक असेल. तसेच, कंत्राटदारामार्फत नियुक्त केल्या जाणा-या कामगारांचे शैक्षणिक प्रमाणपत्र नियुक्तीपुर्वी या कार्यालयास सादर करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा तसेच अधिनस्त तालुका न्यायालय हिंगणघाट, आर्वी, समुद्रपुर व सेलू येथे बाह्ययंत्रणेव्दारे कंत्राटी तत्वावर सफाईगार, शिपाई व पहारेकरी या पदांवरील कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यात येणा-या कामगारांचे कामासंबंधीचे विवरण खालीलप्रमाणे आहे.

# परिशिष्ट - ड

## पदाचे नाव - शिपाई

| कंत्राटी पदाचे नाव | कामाबाबतचा तपशील | |
|---|---|---|
| शिपाई | १) | न्यायालयात विहीत कार्यालयीन वेळेत उपस्थित राहणे आणि कार्यालयाने निर्धारीत केलेल्या गणवेशात कार्यालयीन वेळ पूर्ण होईपर्यत कर्तव्य पार पाडणे. |
| | २) | कामाच्या वेळेत पीठासीन अधिका-यांच्या निर्देशानुसार काम करणे. |
| | ३) | कामाच्या वेळेत न्यायालयीन कर्मचा-यांनी दिलेल्या निर्देशानुसार काम करणे. |
| | ४) | न्यायपिठ लिपीक आणि शिरस्तेदार यांना त्यांच्या गरजेनुसार कामात मदत करणे. |
| | ५) | न्यायदान कक्ष व निजी कक्ष (Court Hall and Chember) रोज झाडू लावणे आणि न्यायदान कक्ष, निजी कक्ष, कर्मचा-यांच्या खोल्या, मालखाना इत्यादी स्वच्छ आणि निटनेटके ठेवणे. |
| | ६) | टेबल, खुर्च्या, संगणक, रॅक इत्यादी स्वच्छ करणे. |
| | ७) | संगणक, इतर उपकरणे, संगणक खुर्च्या आणि संगणक टेबल दररोज स्वच्छ करणे. तेथे धूळ आणि कचरा राहणार नाही याची काळजी घेणे. |
| | ८) | न्यायालयातील दैनदिंन सुचीतील नमुद पक्षकार व अधिवक्ता यांचा पुकारा करणे |
| | ९) | संबंधीत न्यायालयाशी संलग्न पीठासीन अधिकारी आणि कर्मचा-यांनी निर्देशित केलेले इतर कोणतेही काम करणे. |

## पदाचे नाव - पहारेकरी

| कंत्राटी पदाचे नाव | कामाबाबतचा तपशील | |
|---|---|---|
| पहारेकरी | १) | कार्यालयाने विहीत केलेल्या वेळेत न्यायालयात/कार्यालयीन वेळेत उपस्थित राहणे आणि कार्यालयाने निर्धारित केलेल्या गणवेशात कार्यालयीन वेळ पूर्ण होईपर्यत कर्तव्ये पार पाडणे. |
| | २) | कामाच्या वेळेत पीठासीन अधिका-यांच्या निर्देशानुसार काम करणे. |
| | ३) | कामाच्या वेळेत न्यायालयीन कर्मचा-यांनी दिलेल्या निर्देशानुसार काम करणे. |
| | ४) | पहारेकरी पदावरील कंत्राटी कामगारास पीठासीन अधिकारी यांनी निर्देशित केल्याप्रमाणे प्रत्येक दिवशीच्या तीन पाळयापैकी कोणत्याही एका पाळी मध्ये कर्तव्य पार पाडावे लागेल. |
| | ५) | ठराविक दिवसांनी किंवा सोयीनुसार पाळीत बदल केल्यास, नवीन पाळीतील पहारेकरी येईपर्यत डयुटीवर हजर राहणे आणि कर्तव्ये पार पाडणे. |

| | | |
|---|---|---|
| | ६) | न्यायालयीन इमारत व परिसराची गस्त करतांना कोणत्याही संशयास्पद हालचाली व दुर्घटनांची नोंद ठेवणे आणि आवश्यक ती माहिती अधिका-यांना पोचविणे. |
| | ७) | संस्थेच्या मालमत्तेचे आणि परिसराचे संरक्षण करणे. |
| | ८) | अपातकालीन परिस्थितीत जसे आग लागणे, चोरी होणे किंवा इतर कोणतीही आपत्तीची पीठासीन अधिकारी यांना तात्काळ माहिती देवून योग्य ती कार्यवाही करणे. |
| | ९) | केवळ अधिकृत व्यक्तिंनाच न्यायालयीन परिसरात प्रवेश देणे आणि अनधिकृत व्यक्तींना रोखणे. |
| | १०) | न्यायालयीन परिसर आणि प्रवेशव्दारांवर बारीक लक्ष ठेवणे आणि संशयास्पद वाटणा-या कोणत्याही व्यक्तींवर किंवा गोष्टींवर लक्ष ठेवणे. |
| | ११) | आवश्यकतेनुसार संबंधित न्यायीक अधिकारी किंवा कर्मचा-यांशी संपर्क साधणे. |

## पदाचे नाव - सफाईगार

| अ. क्र. | कामाबाबतचा तपशिल | कामाची वारंवारीता | काम करण्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १) | फरशीच्या स्वच्छतेबाबत (व्हरांडा/कॉरीडोअर व जिन्या मधील फरशी) | दररोज दिवसातुन एकदा व गरजेनुसार | झाडणे, घासून स्वच्छ करणे व कोरडया कपडयाने पुसून घेणे. |
| २) | वॉश बेसीन, सार्वजनिक प्रसाधनगृहे, व्हरांडयातील पिण्याच्या पाण्याचे नळ व त्या भोवतीची जागा. | दररोज दिवसातुन दोन वेळा | धुणे व ॲसिड व फिनाईलचा वापर करुन घासुन स्वच्छ करणे. |
| ३) | बागेचा परिसर, इमारती सभोवतालचा संपूर्ण मोकळा परिसर व रस्ते | दररोज दिवसातुन एकदा | झाडून स्वच्छ ठेवणे |
| ४) | व्हरांडयामधील लोखंडी जाळया, खिडक्यांच्या काचा/तावदाने, खिडक्यांची चौकट, पंखे, दरवाजे व जिन्याची रेलिंग | आठवडयातून एका ठराविक दिवशी एकदा | ओल्या कपडयाने स्वच्छ करुन कोरडया कपडयाने पुसून घेणे व काच ग्लास क्लीन कीटचा वापर करुन स्वच्छ ठेवणे. |
| ५) | इमारतींचे स्तंभ व लगतच्या भिंतीच्या स्वच्छतेबाबत | आठवडयातून एका ठराविक दिवशी एकदा | झाडून धुळ, जाळे काढुन स्वच्छ करणे. |
| ६) | प्रत्येक माळयावरील व्हरांडयामधील पिण्याचे पाण्याचे वॉटर कुलर व त्या भोवतीची जागा | दररोज दिवसातुन दोन वेळा | वॉटर कुलर आतून व बाहेरुन धुवुन पुसुन स्वच्छ करणे व त्याभोवतीची जाग स्वच्छ करणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ७) | वॉटर कुलरची पाण्याच्या टाकीची स्वच्छता | आठवडयातुन एका ठराविक दिवशी एकदा | धुवून स्वच्छ करणे. |
| ८) | बागेतील हिरवळीस व परीसरातील शोभेच्या झाडांना पाणी देणे | आठवडयातून ठराविक एका दिवशी एकदा (परंतू उन्हाळयात दररोज एकदा) | बागेतील हिरवळीस पाणी देणे, हिरवळीची वाढ झाल्यानंतर ती कापून घेणे, न्यायालयीन परिसरातील शोभेच्या झाडांना पाणी देणे व त्यांची निगा राखणे. |
| ९) | पाणी साठवण्यांचे सर्व सिमेंटच्या/प्लास्टीकच्या टाक्या व जमिनीखालील पाणी साठवण्याचे हौद यांच्या साफसफाईबाबत. | दोन महिण्यातून एक वेळा | आतून धुवून व पुसून स्वच्छ करणे आणि योग्य प्रमाणात ब्लिचींग पावडरचा वापर करणे. |
| १० | कच-याची विल्हेवाट व त्यासाठी असलेल्या डस्टबीन स्वच्छ करणे. (परिसरातून कचरा, झाडांची वाळलेली पाने इत्यादी गोळा करणे) | दररोज दिवसांतून एकदा तसेच डस्टबिन साफ करणे, ओला व कोरडा कचरा वेगवेगळा करणे. | जमा झालेल्या कच-याची विल्हेवाट लावणे. (मानवी पध्दतीने) |
| ११ | सर्व न्यायालयीन इमारतींचे छत साफ करणे | महिन्यातून एकदा | |
| १२ | इमारतींना पाणी पुरवठा होणा-या टाकींमधे मशीनद्वारे पाणी भरणे | दररोज पुर्णवेळ पाणी पुरवठा राहील या प्रमाणे | |
| १३ | सर्व न्यायालयीन इमारतींच्या आवारात व व-हांडा परिसरात बसविण्यात आलेल्या यंत्रसामुग्री व उपकरणे यांची साफसफाई करणेबाबत | दररोज दिवसांतून एकदा | धुळ काढणे, कपडयाने स्वच्छ करुन पुसून घेणे. |
| १४ | कामाच्या वेळेत पीठासीन अधिका-यांच्या निर्देशानुसार काम करणे तसेच कामाच्या वेळेत न्यायालयीन कर्मचा-यांनी दिलेल्या निर्देशानुसार काम करणे. | | |

(३) कंत्राटदारास तत्सम स्वरुपाचे काम करण्याचा कमीत कमी तीन वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.

(४) ई-निविदेमध्ये भाग घेण्याकरीता कंत्राटदारांना डिजीटल सर्टिफिकेट काढणे आवश्यक आहे.

(५) ई-निवीदा सुचनेमध्ये नमुद केलेल्या वेळापत्रकानुसार ई-निविदा पुस्तीका फॉर्म (Form) खरेदी/डाउनलोड/बीड भरणे/बीड समाविष्ठ करणे/सेवा शुल्क जमा करणे/बयाना/अनामत रक्कम जमा करणे ही सर्व प्रक्रिया विहीत वेळेत पूर्ण करणे आवश्यक आहे.

(६) ई-निविदा दोन लिफाफा ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहे. (तांत्रीक व आर्थिक (व्यापारी) निवीदा प्रपत्र १ मधील आवश्यक दस्तऐवज, निविदा नमुना तसेच प्रपत्र २ मधील नमुना १ व २ विहीत नमुन्यातच असावी.)

(७) कंत्राटदारास तो उपलब्ध करुन देत असलेल्या कंत्राटी सेवांसाठी शासन दिनांक २७/०२/२०१३,२७/०१/२०१५, २३/०२/२०१७,९/०८/२०१७ व २७/०४/२०२२ व वेळोवेळी निर्गमीत करण्यात आलेल्या सर्व शासन निर्णयातील (सदर शासन निर्णय शासनाच्या WWW.MAHARASHTRA.GOV.IN या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.) निर्देशांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे याची कृपया नोंद घ्यावी.

(८) प्रपत्र-२ मधील स्तंभ क्रमांक ४ व ७ मधील माहिती कंत्राटदारांनी भरावयाची आहे.

(९) कंत्राटदारांनी त्यांच्यामार्फत सदरील शिपाई, सफाईगार व पहारेकरी या कामासाठी नियुक्त केलेल्या कामगारांना घ्यावयाच्या वेतनाची रक्कम व अतिकालीक भत्त्याची रक्कम ही किमान वेतन कायदयातील तरतुदीपेक्षा कमी नसावी.

(१०) खाजगी कंत्राटदार हे त्यांच्या वतीने नेमण्यात येणा-या कंत्राटी कामगारांची नावे, त्याचा पत्ता, फोटोसह ओळखपत्र व त्यांची चारित्र्यविषयक प्रमाणपत्रे या कार्यालयात सादर करतील.

(११) सदर कामाकरीता कंत्राटदार यांना देय मोबदला हा एक महिन्याचा कालावधी संपल्यानंतर देण्यात येईल. काही तांत्रिक अथवा अपरिहार्य कारणास्तव मोबदला देण्यास उशिर झाल्यास सदर रकमेवर व्याज देय राहणार नाही. तसेच देण्यात येणा-या मोबदल्यावर कर भरण्याची जबाबदारी सर्वस्वी कंत्राटदार यांची राहील.

(१२) कामगारांच्या कामाच्या वेळा कंत्राटदार हे कार्यालयाच्या गरजेनुसार ठरवतील. त्यानुसार कंत्राटी शिपाई कामगारांकरीता सकाळी ०९.३० ते सायंकाळी ०६.०० पर्यंत तसेच कंत्राटी सफाईगार कामगारांकरीता सकाळी ०९.०० ते सायंकाळी ०५.०० पर्यत कामाची वेळ राहील. तसेच सुट्टीच्या दिवशी देखील गरज भासल्यास काम करावे लागेल. कंत्राटी पहारेकरी कामगारांना पीठासीन अधिकारी नेमून देतील त्या पाळीत (Shift) मध्ये डयुटी करावी लागेल.

(१३) कंत्राटदारास त्याने सदरील शिपाई, सफाईगार व पहारेकरी या कामासाठी नेमलेल्या कंत्राटी कामगार यांना किमान वेतन अधिनियम १९४८ मधील तरतुदीनुसार वेतन, महागाई भत्ता, ईतर भत्ते व सवलती लागु करणे कंत्राटदारावर बंधनकारक असेल.

(१४) शिपाई, सफाईगार व पहारेकरी या कामी कंत्राटदारामार्फत नियुक्त केल्या जाणा-या कामगारांना अदा करावयाची वेतनाची रक्कम, ही किमान वेतन कायद्यातील तरतुदीनुसार कंत्राटदारांकडून कंत्राटी कामगाराला देय असलेले किमान वेतन + विशेष भत्ता + बोनस + भविष्य निर्वाह निधी + राज्य कामगार विमा योजनेत जमा करावयाची रक्कम + उपदान इत्यादी मिळून होणारी रक्कम कामगारांना अदा करण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारांवर राहील.

(१५) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग यांचे परिपत्रक क्रमांक : संकिर्ण-२०१८/प्र.क्र.४७/विमा प्रशासन, दिनांक १३ जुलै, २०२२ मधील निर्देशानुसार जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा यांचे मुख्यालय तसेच अधिनस्त तालुका न्यायालये येथील शिपाई, सफाईगार व पहारेकरी या कंत्राटी कामाचा व त्यासाठी नियुक्त कामगारांचा विमा संचालनालयाकडे विमा उतरविणे बंधनकारक राहील. तसेच, सदर परिपत्रकातील निर्देशांचे पालन करणे बंधनकारक राहील.

(१६) कंत्राटदाराने न्यायालयाचे कामकाजासाठी नेमलेल्या कंत्राटी कामगारांना किमान वेतन कायद्यातील तरतुदीपेक्षा कमी वेतन अदा केल्याचे निदर्शनास आले तर संबंधीत कंत्राटदारावर किमान वेतन कायद्यातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल व त्याचे कंत्राट तात्काळ रद्द करुन त्याचे नांव काळया यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल. त्याअनुषंगाने कंत्राटदार यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी नेमणुक केलेल्या कर्मचा-यांच्या वेतनाबाबतच्या किंवा सेवेबाबतच्या कोणत्याही तक्रारी या कार्यालयाकडे येणार नाही याची त्यांनी दखल घ्यावी. काम करतांना कामगारांना कोणतीही ईजा किंवा नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी संबंधीत कंत्राटदार यांची राहील.

(१७) कंत्राटदारा मार्फत नियुक्त करण्यात आलेल्या सर्व कंत्राटी कामगारांना कामाचे वेतन व त्याअनुषंगीक ईतर सर्व भत्ते रोख स्वरुपात अदा न करता संबंधीत कंत्राटी कामगाराच्या नावाने Account Payee Cross Cheque द्वारेच (रेखांकित धनादेशाद्वारेच) किंवा ई. सी.एस.द्वारे/ एन.ई.एफ.टी द्वारे त्यांचे बॅक खात्यात कंत्राटदार अदा करतील त्याचे उल्लंघन करणार नाही.

(१८) कंत्राटदाराने त्यांच्या मार्फत नियुक्त करण्यात आलेल्या सर्व कंत्राटी कामगारांना दिलेल्या वेतनाच्या /ईतर भत्त्यांच्या धनादेशाची (चेकची) छायांकित प्रत, किंवा आर.टी.जी.एस द्वारे / एन.ई. एफ.टी. द्वारे वेतनाची रक्कम / ईतर भत्त्याची रक्कम कंत्राटी कामगारांच्या खात्यात जमा केल्याचे दर्शविणारे बँकेचे विवरणपत्र (Statement) तसेच कंत्राटी कामगारांची स्वाक्षरी असलेले वेतन देयक ( ज्यावर सदर धनादेश क्रमांक / आर.टी.जी.एस. क्रमांक / एन. ई. एफ.टी. क्रमांक लिहीलेला असेल ) हे कंत्राटदाराने दरमहा संबंधीत कार्यालयास सादर करावे, जोपर्यंत कंत्राटदार वरील कागदपत्रे संबंधीत कार्यालयास सादर करणार नाही तोपर्यंत त्या महिन्याचे कंत्राटदाराचे देयक अदा करण्यात येणार नाही.

(१९) दुस-या व चौथ्या शनिवारी (कार्यालय बंद असेल त्या दिवशी) कंत्राटी शिपाई व सफाईगार कामगारांना कामावर बोलाविण्यात आले नसल्यास त्यांचे वेतन कापून घेण्यात येवून नये तथापी दुस-या व चौथ्या शनिवारी तसेच कार्यालय बंद असेल त्या दिवशी कंत्राटी शिपाई व सफाईगार कामगारांना काम करण्यासाठी कार्यालयात बोलविण्यात आले तर त्यांना कार्यालयात येणे बंधनकारक राहील व त्यासाठी त्यांना वेगळा मोबदला मिळणार नाही. कामाचे दिवशी कंत्राटी शिपाई व सफाईगार गैरहजर असेल त्या दिवशी त्याचे जागी पर्यायी कंत्राटी शिपाई व सफाईगार कामगाराची व्यवस्था करणे कंत्राटदार यांचेवर बंधनकारक राहील. अशी पर्यायी व्यवस्था न केल्यास कंत्राटदारावर दंड आकारण्यायत येईल किमान वेतन कायद्यातील तरतूदीप्रमाणे कंत्राटी कामगाराला दर आठवडयास एक (रविवारी) भरपगारी सुट्टी देणे ही बाब कंत्राटदार यांचेवर बंधकारक राहील.

(२०) कंत्राटी पहारेकरी कामगारांना किमान वेतन कायद्यातील तरतूदीप्रमाणे दर आठवडयास एक (रविवारी) भरपगारी सुट्टी देणे ही बाब कंत्राटदार यांचेवर बंधनकारक राहील तथापी कंत्राटी पहारेक-याच्या साप्ताहीक सुट्टीच्या दिवशी किंवा तो गैरहजर असेल त्या दिवशी त्याचे जागी पर्यायी पहारेकरी कामगाराची व्यवस्था करणे कंत्राटदार यांचेवर बंधनकारक राहील. अशी पर्यायी व्यवस्था न केल्यास कंत्राटदारावर दंड आकारण्यात येईल.

(२१) सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कामगारांना कामावर बोलविण्यात आले नसल्यास त्यांचे त्या दिवसाचे वेतन कापून घेण्यात येवू नये. तथापी सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कामगारांना काम करण्यासाठी कार्यालयात बोलविण्यात आले तर त्यांना कार्यालयात येणे बंधनकारक राहील, व त्या ऐवजी त्या कंत्राटी कामगारास बदली रजा अथवा किमान वेतन अधिनियम व कामगार कायदयानुसार देय असलेले त्या दिवसाचे वेतन यापैकी कोणताही एक पर्याय निवडता येईल. कामगाराचे बदली रजेच्या/गैरहजेरीच्या दिवशी दुसरा कामगार उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कामगारांसाठी किमान वेतन कायदा व कामगार कायदयातील तरतूदीनुसार योग्य ते वेतन संबंधीत कंत्राटदाराकडुन अदा करण्यात येईल.

(२२) कंत्राटी कामगांराना जास्तीचे काम करावे लागल्यास त्यांना अतिकालीन भत्ता (ओव्हरटाईम) देणे कंत्राटदारास बंधनकारक असेल व सदर अतिकालीक भत्ता (ओव्हरटाईम) देणे कंत्राटदारास बंधनकारक असेल व सदर अतिकालीक भत्ता देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर असेल.

(२३) कंत्राटदारांचे वतीने नेमण्यात आलेल्या सर्व कामगारांनी जिल्हा न्यायालयाने मंजूर केलेल्या एकाच रंगाच्या गणवेशात व कंत्राटदाराने पुरविण्यात आलेल्या ओळखपत्रासहीत हजर रहावे लागेल. सदर गणवेश कंत्राटदाराने त्यांनी नेमणेल्या कामगांराना पुरवावे व नेमलेल्या कामगारांना/कंत्राटदारास धुलाई भत्ताची कुठलीही मागणी या कार्यालयास करता येणार नाही.

(२४) कंत्राटदार यांना देण्यात आलेल्या कंत्राटी सेवेबद्दल ते किंवा त्यांचे वतीने नेमण्यात आलेल्या कंत्राटी कामगार यांना या कार्यालयाकडे कायमस्वरुपी नियुक्ती करीता हक्क मागण्याचा अधिकार राहणार नाही.

(२५) कंत्राटदार व त्यांचे वतिने नेमण्यात आलेले कंत्राटी कामगार हे कार्यालयात काम करतांना त्यांचे नजरेस ज्या काही बाबी येतील त्या कार्यालयीन बाबी आहेत. याची जाणीव ठेवून त्यासंबंधात आवश्यक ती गोपनियता ठेवतील. तसेच न्यायालयीन कामकाजात कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप होणार नाही याबाबतची दक्षता घेतील. गोपनियतेचा भंग झाल्यास सदरचा करार अशत: अथवा पुर्णत: रद्द करण्यात येईल. तसेच कंत्राटदार व त्याच्या वतिने नेमण्यात आलेले कंत्राटी कामगार यांचेवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

(२६) कंत्राटदार हे त्यांच्या वतीने नेमण्यात आलेल्या कंत्राटी कामगारांकडून दररोज वक्तशीरपणे व नियमीतपणे या कार्यालयाचे काम करवून घेतील. त्यांची कार्यालयातील वर्तणुक व कामाची गुणवत्ता उच्च दर्जाची राहील व त्यांचे उत्तरदायीत्व हे कार्यालयाच्या सर्व हिंसंबंधाचे रक्षण करणेच राहील. तसेच कंत्राटदाराचे वतीने नेमण्यात आलेल्या कंत्राटी कामगारांकडून वक्तशिरपणे व नियमीतपणे व तसेच कार्यालयास उपद्रव होणार नाही याची काळजी घेवून काम करुन घेतील. तसेच कामगार अयोग्य व अपात्र तसेच कामचुकार, कामात हलगर्जी असल्याचे अथवा त्याची कार्यालयीन कामा प्रती सचोटी, निष्ठा व प्रमाणीकपणा दिसून येत नसल्याचे किंवा त्यांचे अशोभनीय गैरर्वतन अदा, तंबाखू, गुटखा खातांना, मद्यपान करुन कामावर असल्याचे आढल्यास, मोठमोठयाने बोलुन शांततेचा भंग इत्यादी करत असल्याचे आढळल्यास त्या कामगारास काढून टाकणे संबंधीत आदेश देण्याचे अधिकार या कार्यालयास राहतील.

(२७) कंत्राटदाराने नेमलेल्या कामगारास काम करतांना कोणतीही इजा, अपघात अथवा मनुष्यहानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारांची राहील, त्यास हे कार्यालय कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाहीत.

(२८) कंत्राटासंबधी कोणताही विवाद निर्माण झाल्यास हे कार्यालय नेमतील ते न्यायाधीश लवाद म्हणुन काम पाहतील व १९९६ च्या लवादाच्या कायद्यानुसार या विवादाबाबत त्यांचा निर्णय बंधनकारक असेल.

(२९) कंत्राटदाराने नेमलेल्या कंत्राटी कामगारांकडून सरकारी मालमत्तेचे नुकसान झाले, असे या कार्यालयास आढळून आल्यास कंत्राटदारास देण्यात येणा-या मोबदल्यामधुन सदर रक्कम वसूल करण्यात येईल.

(३०) कंत्राटदाराने नेमलेले कामगार व या कार्यालयामध्ये मालक व कर्मचारी असे संबंध राहणार नाहीत. कंत्राटदार हे पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट, १९३६, एम्पलॉई प्रॉव्हीडंट फंड ॲक्ट, पेमेंट ऑफ ग्रच्युईटी ॲक्ट १९७२, वर्क्समॅन कॅपिनसेशन ॲक्ट, वर्क्स कॉन्ट्रक्ट, जी.एस.टी. टॅक्स ॲक्ट, मिनिमम वेजेस ॲक्ट १९८४, इंडस्ट्रीयल डिस्प्युट ॲक्ट १९४७, कॉन्ट्रॅक्ट लेबर (Prohibition & Regulation) ॲक्ट १९८६ या व सर्व कामगार कायद्यांच्या तरतुदींचे पालन करण्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहील. तसेच सदरच्या उपरोक्त कायद्याच्या परीणामांची जबाबदारी कंत्राटदारावर राहील. सदरचे काम करण्यासाठी कायद्यानुसार लागणार सर्व परवाने घेण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

(३१) सदर निविदा व त्याअंतर्गत होणारी आउटसोर्सिंगद्वारे मनुष्यबळाची नेमणूक ही मा. उच्च न्यायालय यांची पुर्वमान्यता तसेच मंत्रालय, मुंबई यांचे मार्फत मंजूरी प्राप्त झाल्यानंतरच अंमलात येईल. सदर मंजुरी प्राप्त न झाल्यास किंवा विलंब झाल्यास, निविदा प्रकिया स्थगित/ रद्द करण्याचा अथवा करार अमान्य ठरविण्याचा संपूर्ण अधिकार संबंधित कार्यालय राखून ठेवेल तसेच याबाबत सेवा पुरवठादारास कोणत्याही प्रकारची आर्थीक भरपाई, नुकसान भरपाई अथवा दावा करता येणार नाही.

(३२) निविदाकार जर त्याची निविदा यशस्वी म्हणुन स्विकारण्यात आल्यानंतर त्यासंबंधीतच्या आवश्यकतेनुसार कोणत्याही लेखी करारावर सही करु शकला नाही किंवा कराराच्या कामगीरीच्या संदर्भात आवश्यक सुरक्षा भरु शकला नाही तर सदर कार्यालय निविदा प्रक्रीया रद्द करु शकेल.

(३३) निविदाकार जर कोणत्याही गुन्हयाकरीता दोषी ठरविण्यात आला तर, सदर कार्यालय,
१) दोषी ठरलेल्या निविदाकाराची निविदा यशस्वी म्हणुन घोषीत केली गेली असेल पंरतू करार करण्यात आलेला नसेल तर संबंधीत निविदा प्रक्रिया रद्द करेल.
२) सदर कार्यालय आणि दोषी ठरलेल्या निविदाकारामध्ये जर करार करण्यात आला असेल तर, संबंधीत करार रद्द करेल किंवा कराराचे भरलेले सर्व मुल्य किंवा त्याचा भाग जप्त करेल.

(३४) निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर निविदा प्रक्रियेमधुन माघार घेतल्यास त्याची बयाना रक्कम जप्त करण्यात येईल.

(३५) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक : भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ मधील प्रकरण क्रमांक ६ (परिशिष्टे) मधील परिशिष्टे-८ मधील अनुक्रमांक १ मध्ये नमुद केल्याप्रमाणे सुक्ष्म व लघु, मध्यम उद्योग विकास अधिनियम-२००६ अंतर्गत उत्पादक म्हणून नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म व लघु उत्पादक उद्योगांना निविदा शुल्क व बयाना रक्कम भरण्यापासून सूट देण्यात येत आहे. सदर सुट प्राप्त करण्याकरीता निविदाकाराने सुक्ष्म व लघु उत्पादक म्हणून उद्योग विकास अधिनियम-२००६ अंतर्गत नोंदणी केल्याबाबतचे वैध दस्तऐवज परिशिष्ठ क मधील प्रपत्र 1 च्या दस्ताऐवजासोबत सादर करणे आवश्यक राहील.

(३६) तसेच महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक : भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ मधील प्रकरण क्रमांक ६ (परिशिष्टे) मधील परिशिष्टे-८ मधील अनुक्रमांक २ मध्ये नमुद केल्याप्रमाणे शासकीय मंडळ/महामंडळ/उपक्रमांना तसेच सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांतंगत नोंदणीकृत असलेले उत्पादक व पुरवठादार यांना निविदेमध्ये निविदा शुल्क व बयाणा रक्कम भरण्यापासुन सुट देण्यात येत आहे. तसेच महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ/महासंघ हे वगळता इतर नोंदणीकृत पुरवठादारांना उत्पादकाकडून अधिकृत विक्रेता असल्याचे प्राधिकार पत्र परिशिष्ठ क मधील प्रपत्र 1 च्या दस्ताऐवजासोबत सादर करणे आवश्यक राहील.

(३७) १) यशस्वी निविदाकाराने/कंत्राटदार यांना एकूण कंत्राटाच्या रकमेच्या ३ टक्के अनामत रक्कम मुदत ठेव जमा दोन वर्षांकरीता (करार कालावधीकरीता) सुरक्षा ठेव म्हणून द्यावी लागेल. तसेच त्यांनी कराराच्या कोणत्याही अटी व शर्तीचा भंग केल्यास मुदत ठेव रक्कम जप्त करण्याचा हक्क या कार्यालयास राहील.
२) निविदेचा निकाल अधिसुचित केल्यानंतर निविदाकाराने पंधरा दिवसाच्या आत अनामत रक्कम सादर करावी. असे न केल्यास निकालाची अधिसुचना रद्द करण्यात येईल.

(३८) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक : भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रकरण क्रमांक ४ मधील अनुक्रमांक ४.६ मधील मुद्दा क्रमांक "ब", "क" आणि "ड" मध्ये दिल्यानुसार नमुद संस्था/महामंडळे/मायक्रो, स्मॉल आणि मिडीयम एन्टरप्रायझेस/महाराष्ट्र शासनाच्या अंतर्गत येणा-या सर्व शासकीय आणि अर्ध शासकीय संस्था तसेच महाराष्ट्रातील जिल्हा परिषदा आणि कोणत्याही राज्य शासनाचे आणि भारत सरकारचे पूर्ण मालकिचे उपक्रम यांना नमुद नियमाप्रमाणे अनामत रक्कम देय राहील. सदर अनामत रक्कम देय करण्याकरीता निविदाकाराने सुक्ष्म व लघु उत्पादक म्हणून उद्योग विकास अधिनियम-२००६ अंतर्गत नोंदणी केल्याबाबतचे वैध दस्तऐवज तसेच महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ/महासंघ हे वगळता इतर नोंदणीकृत पुरवठादारांना उत्पादकाकडून अधिकृत विक्रेता असल्याचे प्राधिकार पत्र व शासकीय आणि अर्ध शासकीय संस्था महाराष्ट्रातील जिल्हा परिषदा आणि कोणत्याही राज्य शासनाचे आणि भारत सरकारचे पूर्ण मालकिचे उपक्रम यांनी त्याच्या संस्थेबाबत वैध दस्तऐवज व अनामत रक्कमेत नियमाप्रमाणे कमी अनामत रक्कम जमा करण्याबाबतचा अर्ज सादर करणे अनिवार्य असेल.

(३९) कंत्राटदारास अदा करावयाचे देयक प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेपर्यंत संबंधित तालुका न्यायालयाने कंत्राटी कामगारांनी त्यांना नेमून दिलेले काम योग्य रितीने केल्या बाबतचे प्रमाणपत्र जिल्हा न्यायालय, वर्धा येथे जमा केल्यावरच अदा करण्यात येईल.

(४०) जिल्हा न्यायालय, वर्धा येथील सर्व प्रकारची कामे (परिशिष्ट-ड) कंत्राटी पध्दतीने करुन घेतल्या बाबतचा मासिक अहवाल असामाधानकारक आल्यास कंत्राटादारास देण्यात येणा-या मोबदल्यातुन मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश ठरवतील त्या प्रमाणे रक्कम वजा करण्यात येईल.

(४१) कंत्राटदार यांनी बयाना रक्कम (Earnest Money Deposit) Net banking द्वारे जमा करावी.

(४२) ज्या ई-निविदा स्विकारण्यात आलेल्या नाहीत अशा कंत्राटदारांनी दिलेली बयाना (EMD) रक्कम ती ई-निविदा ही मा. उच्च न्यायालय यांची पुर्वमान्यता तसेच मंत्रालय, मुंबई यांचे मार्फत मंजूरी या कार्यालयास प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसात महाईटेंडरशी संलग्नतेमुळे थेट त्यांच्या मार्फत परत केल्या जाईल.

(४३) सर्व ई-निविदा या संगणक विभाग/परिषद कक्ष, जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथे दिलेल्या तारखेस व वेळी उघडण्यात येतील.

(४४) केवळ ई-निविदा किंवा बयाना (EMD) रक्कम जमा केली म्हणुन कंत्राटावर हक्क सांगता येणार नाही.

(४५) निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमधून कोणत्याही टप्प्यावर निविदेतून माघार घेतल्यास त्याची बयाणा (EMD) रक्कम जप्त करण्यात येईल.

(४६) कंत्राटदार यांनी कंत्राटा दरम्यानच्या काळात वरील अटी व शर्तीचे पालन करील असे हमीपत्र लिहून द्यावे लागेल.

(४७) कंत्राटी कर्मचारी दररोज उपस्थित असणे बंधकारक राहील. कंत्राटी कर्मचारी उपस्थित नसल्यास त्या दिवसाचे वेतन कंत्राटदाराने देयकात समाविष्ट करु नये, केल्यास त्याचे त्या दिवसाचे वेतन प्रदान करण्यात येणार नाही.

(४८) निविदाकारा विरुध्द वर्धा न्यायीक जिल्हयात फौजदारी खटला तसेच दिवाणी दावा प्रलंबित असल्यास/दिवाणी दावा दाखल केला असल्यास त्याबाबतची माहिती पुरविणे बंधनकारक राहील. अशी माहिती न पुरविल्यास निविदा कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा तसेच त्यासंबंधी वेळेनुसार निर्देश व कंत्राटदार यांचेकडून हमीपत्र सादर करण्याचे आदेश करण्याचे अधिकार हे कार्यालय राखुन ठेवत आहे.

(४९) जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा या कार्यालयात कत्रांटदाराने बाहययंत्रणेव्दारे पुरविण्यात येणा-या कंटात्री कर्मचारी शिपाई, सफाईगार व पहारेकरी यांचे विरुध्द कोणताही फौजदारी खटला प्रलंबित नसावा तसेच कोणत्याही फौजदारी खटल्यात शिक्षा झालेला नसावा. तसेच पुरविण्यात येणा-या कंत्राटी कर्मचारी यांचे पोलीस पडताळणी करुन त्याबाबतचे प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

(५०) सेवाकाराराच्या दरम्यान कंत्राटदाराची सेवा असमाधानकारक आढळून आल्यास सदर करार नोटीस देवून रद्द करण्यात येईल आणि सदरचे काम इतर दुस-या एजन्सीकडून कंत्राटदाराच्या जबाबदारीवर व त्याच्या खर्चाने दुसरी व्यवस्था होईपर्यंत करुन घेतले जाईल.

(५१) ई-निवीदा भरणा-या सर्व निवीदाकारांसाठी महाराष्ट्र शासनाची ई-निवादा प्रणाली https:www.maharashtra.gov.in वापरण्यासाठी मार्गदर्शक तत्वे :-

(१) खालील नमुद केलेली ई-निवीदा प्रणाली संदर्भातील मार्गदर्शक तत्वे जुन्या प्रचलीत निवीदा प्रक्रियेतील निवीदा खरेदी, निवीदा जमा करणे आणि निवीदा उघडण्याच्या प्रक्रियेस रद्द ठरवतील.

(२) निवीदाकारांची नोंदणी :-

सर्व ईच्छुक निवीदाकार, जे कोणत्याही शासकीय खात्याबरोबर / शासकीय संस्थेबरोबर व्यापार करु ईच्छितात त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या https://www.mahatenders.Gov.in या प्रणालीवर ई-निवीदा नोंदणी करणे आवश्यक आहे.

कोणत्याही शासकिय खात्याबरोबर / संस्थेबरोबर Open Tenders या प्रकारात सहभागी होण्यासाठी निवीदाकारांना महाराष्ट्र शासनाच्या ई-निवीदा प्रणालीवर नोंदणी करणे आवश्यक आहे.

सर्व निवीदाकारांना नोंदणी करण्या संदर्भातील माहीती ही Help Desk Support Team कडून दिली जाईल अथवा निविदाकार ती माहिती महाराष्ट्र शासनाच्या ई-निवीदा प्रणालीच्या वेबसाईटवर जावुन how to enroll या सदरातून घेवू शकतात.

(३) निवीदेची तपशिलवार सुचना ऑनलाईन पाहणे :-

निविदाकार शासकीय खाती / शासकीय संस्थेची उपलोड केलेल्या निवीदा तसेच त्यांचे वेळापत्रक (key dates) त्या त्या खात्याच्या अथवा एजन्सीच्या वेबसाईटवर पाहू शकतात.

४ निविदा संच ऑनलाईन Download करणे :-

निविदाकार शासकय खाती : शासकीय संस्थेची अपलोड केलेल्या निविदा तसेच त्यांचे वेळापत्रक (key dates) त्या त्या खात्याच्या अथवा एजन्सीच्या वेबसाईटवर Download करु शकतात. यासाठी निविदाकारांना नोंदणी करणे आवश्यक आहे.

५ बयाना रक्कम जमा करणे

निविदाकाराला ई-निविदा फॉर्म शुल्क फक्त Online-Net banking द्वारे व बयाना (EMD) रकमेचा भरणा फक्त Online-Net banking द्वारेच करणे आवश्यक राहील. तसेच सदरील बयाना रक्कम आणि टेंडर फॉर्म फी ची माहिती निविदा धारका जवळ असणे जरुरीचे आहे. जेणेकरुन तो ती माहिती Bid Preparation आणि Bid Submission च्या कालावधी वापरु शकतो. सदरील माहिती ही Online निविदा उघडते वेळी तपासली जाईल.

६ Online निविदा उघडणे बाबत :-

Bid Opening ची सुरुवात करतांना संबंधीत शासकीय कार्यालय हे निविदाकाराने जमा केलेली बयाना रक्कम आणि निविदा फॉम शुल्काचे ऑनलाईन भरलेल्या माहितीवर हुकूम खातर जमा करते. त्यानंतर संबंधीत शासकीय कार्यालय हे ऑनलाईन बीड ओपन करते त्यानंतर संबंधीत शासकीय कार्यालय प्रत्येक बीडरने भरलेली माहिती download करुन ती निविदाकराने बीड सबमिशनच्या वेळी भरलेल्या माहिती बरोबर match करते.

७ ई-निविदा वेळापत्रक :-

सर्व निविदाकरांना विनंती आहे की, त्यांनी निविदा सूचनेप्रमाणे केलेल्या तारखा पहाव्यात कारण ई-निविदा प्रणाली ही दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे कार्य करेल. वेळ संपल्यानंतर कोणताही कार्यवाही करता येत नाही

वर्धा
दिनांक ०५/ ०२ /२०२६

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
वर्धा

# हमीपत्र

मी,श्री.---------------------------------------------प्रो.प्रा.-----------------
------------------------------(संस्थेचे नांव) पत्ता-----------------------------------संस्थेचा नोंदणी क्रमांक ---------------------, संस्थेचा दूरध्वनी क्रमांक ---------------------, याद्वारे असे हमीपत्र लिहून देत आहे की, आपल्या कार्यालयामार्फत जाहीर करण्यात आलेल्या जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा अधिनस्त तालुका न्यायालये येथील शिपाई, सफाईगार व पहारेकरी पदाचे काम शासनमान्य कंत्राटदारामार्फत कंत्राटी सेवेने (आउटसोर्सिंगव्दारे) करुन घ्यावयाच्या कामाकरीता दोन वर्ष कालावधीसाठीचा सेवासंविदा करार करणेसाठी कामाची निविदा भरताना निविदा अर्जासोबतचे निविदा सूचनेमध्ये नमूद केलेल्या आपल्या कार्यालयातील कामाची माहिती करुन त्यानुसार निविदा भरली आहे. तसेच, मी सदर कामासाठीच्या सर्व अटी व शर्तींचे पालन करील.

जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा यांचेद्वारे उपरोक्त कंत्राटी सेवेकरीता निर्गमित केलेली निर्देशन आमचे संस्थेस बंधनकारक राहतील.

ठिकाण :
दिनांक :

| | |
|---|---|
| स्वाक्षरी | -------------------------- |
| निविदाधारकाचे नांव | -------------------------- |
| संस्थेचे नांव | -------------------------- |
| पत्ता | -------------------------- |
| दूरध्वनी क्रमांक | -------------------------- |